# रे.दि.मु.क्र.४०१/२०१० मधील नि.क्र.८८ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचेविरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होवून पुरावा देणेस परवानगी मिळणेबाबत प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेत आला आहे. वादीनी त्यास म्हणणे दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदविला. युक्तीवाद ऐकले.

२) मूळ दावा वाटपाचा आहे. प्रतिवादी यांनी शपथेवर कथन केले की, प्रतिवादी क्र.१ यांना पॅरालिसीसचा अ‍ॅटॅक आल्याने तसेच प्रतिवादी क्र.२ यांना कानाने कमी ऐकू येत असल्याने ते दाव्याकामी मुदतीत पुरावा देवू शकले नाहीत. सदर शपथेवरील कारण मी विचारात घेतले. दावा वाटपाबाबतचा असलेने गुणावगुणावर न्याय देणे नैसर्गिक न्यायतत्वानूसार आवश्यक आहे. संधी नाकारलेस प्रतिवादीचे नुकसान होईल. तथापी विलंबामूळे झालेले कष्ट शूल्क देवून भरुन काढणे आवश्यक आहे. सबब आदेश.

## आदेश

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीस रु.२००/– (रु.दोनशे फक्त) शूल्क देणेच्या अटीवर अर्ज मंजूर.

दिनांक – २५/०७/२०१७

(प्र.अ.कुंभोजकर)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
महाबळेश्वर